# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
## परभणी

जा.क्र.२०२३/ प्र.क्र.१०७ /आस्था-८ /3677
दिनांक : १४/०८/२०२३
17

प्रति,

१. मा. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) वनामकृवि,परभणी
२. मा. संचालक संशोधन , वनामकृवि,परभणी
३. मा.संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि,परभणी
४. नियंत्रक /विद्यापीठ अभियंता, वनामकृवि,परभणी

विषय : महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे तसेच विद्यापीठांचे पुनर्विलोकन करण्यासाठी गठीत अभ्यासगटास सूचना सादर करणेबाबत

संदर्भ : १.कृषि परिषद,पुणे यांचे पत्र .क्र.मकृप/संशोधन-पुनर्विलोकन/ प्र.क्र.६२३/ २१२८/२०२३ दिनांक ०३.०८.२०२३
२.कृषि परिषद,पुणे यांचे परिपत्रक .क्र.मकृप/संशोधन-पुनर्विलोकन/ प्र.क्र.६२३/ २१२७/२०२३ दिनांक ०३.०८.२०२३

उपरोक्त सदर्भीय पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे तसेच विद्यापीठांचे पुनर्विलोकन करण्यासाठी गठीत अभ्यासगटास सूचना सादर करणेबाबत तसेच संदर्भ क्र.२ चे परिपत्रक सर्व संबधितांना अवगत होण्याच्या दृष्टीकोनातून कृषि विद्यापीठाच्या सुचना फलक/संकेतस्थळावर /विद्यापीठातील सर्व विभागात उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सबब, उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, तसेच संदर्भीय परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व विभाग / कार्यालये तसेच अधिकारी /कर्मचारी यांच्या निदर्शनास आनुन देण्यात यावे.

सोबत : संदर्भीय पत्र

(धिरजकुमार रा.कदम)
कुलसचिव

प्रत :

१. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र,वनामकृवि,परभणी यांना देवून कळविण्यात येते की, संदर्भीय परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसरित करण्यात यावे.
२. सहाय्यक कुलसचिव (साप्रवि),कुलसचिव कार्यालय,वनामकृवि,परभणी
३. मा.कुलगुरु महोदय यांचे खाजगी सचिव ,वनामकृवि,परभणी

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७

MCAER
कृषि परिषद

ई-मेल : ______________________ दूरध्वनी (०२०) २५५२८५७७

जा.क्र.मकृप /संशोधन-पुनर्विलोकन/प्र.क्र.६२३/२१२८/२०२३ दिनांक : ०३/०८/२०२३

प्रति,

कुलसचिव,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,राहुरी
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

**विषय : महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे तसेच कृषि विद्यापीठांचे पुर्नविलोकन करण्यासाठी गठित अभ्यासगटास सूचना सादर करणेबाबत..**

**संदर्भ :** १.कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय मकृप १०२२/प्र.क्र.२६४/७-अे, दि.२५/०४/२०२३
२.शासनाचे पत्र क्र. मकृप-१०२२/प्र.क्र. २६४/७-अे, दि. ०१/०६/२०२३.

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे तसेच कृषि विद्यापीठांचे पुर्नविलोकन करण्यासाठी गठित अभ्यासगटाचे मा. अध्यक्ष तसेच सदस्य यांनी अभ्यास गटाचा अहवाल स्वयंस्पष्ट व परिपुर्ण व्हावा यासाठी कार्यकक्षेमध्ये नमूद विषयाच्या अनुषंगाने कृषि विभाग, कृषि विद्यापीठे आणि कृषि परिषदेमधील कार्यरत, सेवानिवृत्त कृषि तज्ञ, शासकीय व खाजगी कृषि संस्थांमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी, प्रगतशील शेतकरी, कृषि उद्योजक तसेच कृषि विद्यापीठातील विद्यार्थी यांचेकडून सूचना मागविण्यात याव्यात असे निर्देश दिलेले आहेत.

मा. अध्यक्ष यांनी मागविलेल्या सूचनेबाबत विद्यापीठस्तरावर प्रसिद्धी व्हावी यासाठी परिपत्रक तयार करण्यात आलेले आहे. तरी सदरचे परिपत्रक सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टीकोनातून कृषि विद्यापीठाच्या सुचना फलक/ संकेतस्थळावर/विद्यापीठातील सर्व विभागात उपलब्ध करुन देण्यात यावे, अशी विनंती आहे.

**सोबत परिपत्रक**

410
04/8/2023
आ-8

सहा.कुलसचिव
उपकुलसचिव

(हरिहर कौसडीकर)
संचालक (संशोधन)

**प्रत-**
उमेश चांदिवडे, अवर सचिव (कृषि विद्यापीठे) कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई यांना महितीस्तव.

3-8-2023

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,
## १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७

सत्यमेव जयते

MCAER
कृषि परिषद

ई-मेल : ______________________ दूरध्वनी (०२०) २५५२८६८८

वाचा — १. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. मकृप १०२२/प्र.क्र.२६४/७-अे, दि.२५/०४/२०२३.
२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. मकृप १०२२/प्र.क्र.२६४/७-अे, दि.०१/०६/२०२३.
३. शासनाचे पत्र क्र. मकृप-१०२२/प्र.क्र. २६४/७-अे, दि. ०१/०६/२०२३.

.............................................................................

जा.क्र.मकृप /संशोधन-पुनर्विलोकन/प्र.क्र.६२३/२१२७/२०२३ दिनांक : ०३/०८/२०२३

**परिपत्रक**

**विषय- महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे तसेच कृषि विद्यापीठांचे पुर्नविलोकन करण्यासाठी गठित अभ्यासगटास सूचना सादर करणेबाबत...**

महाराष्ट्रातील चार कृषि विद्यापीठांमध्ये प्रभावी समन्वय व सुसत्रता साधण्यासाठी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ अन्वये नियम क्र. १२ नुसार दि. १० सप्टेंबर, १९८४ रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेची स्थापना करण्यात आलेली आहे. कृषि परिषदेमार्फत कृषि विद्यापीठांच्या कार्याचा आढावा घेणे, मुल्यमापन करणे आणि मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण यासोबत साधन सामुग्री विकास विभाग, वित्त आणि प्रशासन विभाग करण्यात आलेले आहे.

कृषि क्षेत्र सध्या अनेक नैसर्गिक व जागतिक आव्हानांना सामोरे जात असून भविष्यात शेतीच्या स्थैर्यासाठी संशोधन व शिक्षण या क्षेत्रात कालसुसंगत बदल करणे आवश्यक आहे. यासाठी कृषि विभागाच्या दि. २५/०४/२०२३ व दि. ०१/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे तसेच कृषि विद्यापीठांचे पुर्नविलोकन करण्यासाठी डॉ. आर. बी. देशमुख माजी कुलगुरू, मफुकृवि, राहुरी यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यागट गठीत करण्यात आला आहे. सदर अभ्यास गटाची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे.

१. कृषि क्षेत्राच्या भविष्याचा वेध घेऊन महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि राज्यातील कृषि विद्यापीठे यांच्या संदर्भातील कायदेशीर तरतूदी व प्रचलित नियमावली यांचा आढावा घेऊन कालसुसंगत सधारणा सुचविणे.

२. राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत राज्य कृषि शिक्षण धोरणाचे प्रारुप व त्यानुषंगिक अंमलबजावणी कृती आराखडा तयार करणे.

| कुलसचिव कार्यालय | |
|---|---|
| आवक क्रमांक | 409. |
| दिनांक | 04/8/2023 |
| कार्यालय | आ-8 |
| कक्ष अधिकारी | |
| सहा.कुलसचिव | |
| कुलसचिव | |

forwarded all Director
Balchere
3-8-2023

३. कृषि विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या संशोधन केंद्रांचा संक्षिप्त आढावा घेऊन त्यांचे बळकटीकरण करणे तसेच राज्यात नव्याने लागवडीखाली आलेल्या व प्रस्थापित होत असलेल्या पिकावरील संशोधनासाठी उपाययोजना सुचविणे.

४. कृषि विद्यापीठांतर्गत चालू असलेल्या विस्तार शिक्षण कार्यक्रमांचा राज्याच्या कृषि विभागाच्या कृषि विस्तार योजनांशी समन्वय व सहकार्य वाढवून कृषि विस्तार यंत्रणा सक्षम व परिणामकारक करण्यासाठी उपाय सुचविणे.

५. कृषि विद्यापीठांना मिळणारी अनुदाने, त्यांची स्व-उत्पन्नाची साधने आणि अन्य आर्थिक स्त्रोतांचा आढावा घेऊन त्यांना आर्थिक दृष्टया सक्षम बनविण्यासाठी उपाययोजना सुचविणे. विद्यापीठांचे शासनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

६. कृषि विद्यापीठाकडे असलेल्या जमिनी संदर्भात संरक्षण व व्यवस्थापना करिता उपाययोजना सुचविणे.

तरी, सदर अभ्यास गटाच्या कार्यकक्षेमध्ये नमूद विषयाच्या अनुषंगाने शासकीय व खाजगी शैक्षणिक संस्थेमध्ये कार्यरत अधिकारी, शिक्षकवर्गीय कर्मचारी, कृषि विद्यापीठातील सेवानिवृत्त कृषि तज्ञ यांचेकडून सूचना मागविण्यात येत आहे. सदरच्या बहुमुल्य सूचना कृषि परिषदेच्या ________________________ या ईमेलवर अथवा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे-४११००७ या पत्तावर पोस्टाने / प्रत्यक्षपणे दि. ३१/८/२०२३ पुर्वी सादर करावेत.

(रावसाहेब भागडे)
**महासंचालक तथा सदस्य**
**सचिव, मकृप कार्य पुनर्विलोकन**
**अभ्यासगट**

**प्रत -**

१. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषि) / संधोधन संचालक/ संशोधन विस्तार शिक्षण/ नियंत्रक चारही कृषि विद्यापीठे
यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक विद्यापीठातील सर्व अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी यांना अवगत होण्याच्या दृष्टीकोनातून कृषि विद्यापीठाच्या सुचना फलक/ संकेतस्थळावर/विद्यापीठातीत सर्व विभागात उपलब्ध करुन देण्यात यावे.

२. उमेश चांदिवडे, अवर सचिव (कृषि विद्यापीठे) कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई यांना महितीस्तव.